# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या
# दिनांक : २४/१०/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता
# आयोजित केलेल्या २५१ व्या बैठकीचे कार्यवृत्त

## बाब क्रमांक : २५१/१

**विषय :-** महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या
दिनांक ०६/०९/२०१३ रोजी झालेल्या २५० व्या बैठकीचे
प्रारुप कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत.

----------------------

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

मा.प्रधान सचिव / गृहनिर्माण विभाग, सदस्य / प्राधिकरण यांनी इतिवृत्तातील पृष्ठ क्रमांक ३० वरील बाब क्रमांक २५०/२२, मुंबई मंडळाच्या सोडतीसाठी उत्पन्न गटाच्या मर्यादेत सुधारणा करण्याबाबत, या विषयाच्या ठराव क्र. ६६३२, दिनांक ६/०९/२०१३ मधिल सुधारित उत्पन्न मर्यादेत अत्यल्प उत्पन्न गटाची सध्याची उत्पन्न मर्यादा रु. ८०००/- पर्यंत आहे ती दुप्पट करण्यात यावी, अल्प उत्पन्न गटाची सध्याची उत्पन्न मर्यादा रु. रु. ८००१/- ते २००००/- पर्यंत ही जी आहे ती दुप्पट करण्यात यावी आणि मध्यम उत्पन्न गटाची सध्याची उत्पन्न मर्यादा रु. २०००१/- ते ४००००/- पर्यंत आहे त्यात ७५टक्के वाढ करण्यात यावी व उच्च उत्पन्न गटाची सध्याची उत्पन्न मर्यादा रु. ४०००१/- पेक्षा जास्त जी आहे त्याच्यात ७५टक्क्यांनी वाढ करण्यात यावी, असे बदल करण्याच्या सूचना दिल्या.

सदर सूचनांची नोंद घेण्यात आली.

**ठराव क्रमांक : ६६३२** **दिनांक : ६/०९/२०१३**

**प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील सर्व मंडळांतर्गत बांधण्यात येणा-या सदनिकांची वितरणासाठी सध्या असलेल्या उत्पन्न गटांच्या उत्पन्न मर्यादेत वाढ ही अर्जदारांच्या उत्पन्नात होणारी वाढ व सदनिकांच्या किंमतीत होणारी वाढ विचारात घेऊन पुढीलप्रामणे सुधारित करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.**

| अ.क्र. | उत्पन्न गट | सध्याची उत्पन्न मर्यादा | सुधारित उत्पन्न मर्यादा |
|---|---|---|---|
| १. | अत्यल्प उत्पन्न गट | रु. ८०००/- पर्यंत | रु. १६०००/- पर्यंत |
| २. | अल्प उत्पन्नगट | रु. ८००१/- ते २००००/- पर्यंत | रु. १६००१/- ते ३१०००/- पर्यंत |
| ३. | मध्यम उत्पन्न गट | रु. २०००१/- ते ४००००/- पर्यंत | रु. ३१००१/- ते ६२०००/- पर्यंत |
| ४. | उच्च उत्पन्न गट | रु. ४०००१/- पेक्षा जास्त | रु. ६२००१/- पेक्षा जास्त |

च्या ऐवजी सुधारित ठराव

**ठराव क्रमांक : ६६३२** **दिनांक : ६/०९/२०१३**

**प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील सर्व मंडळांतर्गत बांधण्यात येणा-या सदनिकांची वितरणासाठी सध्या असलेल्या उत्पन्न गटांच्या उत्पन्न मर्यादेत वाढ ही अर्जदारांच्या उत्पन्नात होणारी वाढ व सदनिकांच्या किंमतीत होणारी वाढ विचारात घेऊन पुढीलप्रमाणे सुधारित करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.**

| *अ.क्र.* | *उत्पन्न गट* | *सध्याची उत्पन्न मर्यादा* | *सुधारित उत्पन्न मर्यादा* |
|---|---|---|---|
| *१.* | *अत्यल्प उत्पन्न गट* | *रु. ८०००/- पर्यंत* | *रु. १६०००/- पर्यंत* |
| *२.* | *अल्प उत्पन्नगट* | *रु. ८००१/- ते २००००/- पर्यंत* | *रु. १६००१/- ते ४००००/- पर्यंत* |
| *३.* | *मध्यम उत्पन्न गट* | *रु. २०००१/- ते ४००००/- पर्यंत* | *रु. ४०००१/- ते ७००००/- पर्यंत* |
| *४.* | *उच्च उत्पन्न गट* | *रु. ४०००१/- पेक्षा जास्त* | *रु. ७०००१/- पेक्षा जास्त* |

**सदर सुधारित उत्पन्न मर्यादा प्राधिकरणाच्या सर्व मंडळांना लागू राहतील, यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.**

**बाब क्रमांक : २५१/२**

**विषय :- म्हाडामधील अधिकारी/कर्मचा-यांना सन २०१२-१३ या वर्षाकरीता सानुग्रह अनुदान मिळणेबाबत.**

**----------------------**

**ठराव क्रमांक : ६६३३** **दिनांक : २४/१०/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व विभागीय मंडळांतील अधिकारी / कर्मचा-यांना सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षाकरिता रु. १०,०००/- इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून अदा करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. सदर सानुग्रह अनुदान दिनांक १/११/२०१३ रोजी प्राधिकरण विभाग व विभागीय मंडळांमध्ये कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना देय राहील.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २५१/३**

**विषय :- प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचा-यांना वैदयकीय भत्ता वाढवून मिळणेबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६३४** **दिनांक : २४/१०/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना वेतन देयकातून वैद्यकीय भत्ता म्हणून दरमहा रुपये १२००/- ठराव क्रमांक ६५१८, दिनांक : ३/०३/२०११ अन्वये देण्यात येत आहे. यामध्ये वाढती महागाई विचारात घेऊन दरमहा रुपये १८००/- वाढ करुन दरमहा रुपये ३०००/- याप्रमाणे वेतन देयकातून माहे नोव्हेंबर २०१३ पासून अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायी करणाची वाट न पहात करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

**बाब क्रमांक : २५१/५**

**विषय :- चंद्रपूर जिल्हयातील पत्रकार वर्गातील लाभधारकांकरीता गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६३५** **दिनांक : २४/१०/२०१३**

**प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे नविन चंद्रपूर येथील साईट क्र.१३४ वर मध्यम उत्पन्न गटांतर्गत तळ अधिक पहिला मजला या स्वरुपाच्या पत्रकारांकरिता १०० घरांची योजना राबविण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. तसेच सदर लाभार्थी पत्रकारांकरिता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन संपूर्ण महाराष्ट्रातील पत्रकारांकडून अर्ज मागवून सदर योजना राबविण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.**

## बाब क्रमांक : २५१/६

विषय :- म्हाडाने संपादित केलेल्या उपकरप्राप्त इमारती
व त्या खालील भूखंडाच्या पुर्नविकासाबाबतचे
धोरण निश्चित करणेबाबत.

----------------------

ठराव क्रमांक : ६६३६ दिनांक : २४/१०/२०१३

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, बाब टिपणीत सादर केलेल्या Annexure " A " ते Annexure " E " मधील २१ योजनांपैकी मा.न्यायालयाची स्थगिती असणा-या प्रकरणांना वगळून इतर प्रकरणे म्हाडाने विकास नियंत्रण नियमावली ३३ (५), ३३ (७) व ३३ (९) पैकी ज्या विकास नियंत्रण नियमावलीअंतर्गत म्हाडाचे जास्तीत-जास्त हित साधले जाईल त्या विकास नियंत्रण नियमावलीअन्वये योजना राबविण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे. तसेच सदर निर्णय म्हाडाने संपादित केलेल्या सर्व मालमत्तांना लागू राहील, यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

**बाब क्रमांक :  २५१/७**

**विषय :-  मुंबई मंडळाच्या सोडतीतील लाभार्थ्यांना सदनिकांची रक्कम भरण्यास मुदतवाढ आणि मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रदानता निश्चित करण्याबाबत.**

---------------------

**ठराव क्रमांक : ६६३७**  **दिनांक  :  २४/१०/२०१३**

**प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं,  मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सदनिकांची संपूर्ण रक्कम भरण्यास लाभधारकांस मूळ ९० दिवसांची मुदत संपल्यानंतर त्यापुढे ९० दिवसांपर्यंत विलंब रकमेवर व्याजदर आकारुन मुदतवाढ देण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.**

**बाब क्रमांक : २५१/९**

**विषय :- नेहरुनगर, म्हाडा वसाहत कुर्ला पूर्व येथील जुन्या इमारतीच्या पुनर्विकास/पुनर्बाधणीबाबत चटईक्षेत्राचे वितरण करतेवेळी वितरीत केलेल्या करमणूकीच्या मैदानावरील मंजूर केलेल्या चटईक्षेत्र वितरणात येणा-या अडचणीबाबत निवेदन.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६३८** **दिनांक : २४/१०/२०१३**

**प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, प्राधिकरणाचे दिनांक ६/०८/२०१३ रोजी झालेल्या बैठकीत अभिन्यासास मंजूरी नाही तथापि, महानगर पालिकेस २.५ चटई क्षेत्र निर्देशांकाप्रमाणे अभिन्यास मंजूरीसाठी सादर केलेले अशा सर्व अभिन्यासाबाबत अभिन्यासातील ७५% प्रोरेटा वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने प्राधिकरणाच्या निर्णयाच्या अधिन राहून घेतलेला निर्णय रद्द करण्यात येत आहे.**

## बाब क्रमांक : २५१/१३

**विषय :- निविदा स्वीकृती व निविदांबाबत वाटाघाटी याबाबत प्राधिकरणाच्या अधिकार प्रदानतेमध्ये सुधारणा प्रस्ताव.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६६३९** **दिनांक : २४/१०/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, **NEGOTIATION AND ACCEPTANCE OF TENDERS** च्या पुढीलप्रमाणे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

| NEGOTIATION AND ACCEPTANCE OF TENDERS | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **Sr. No** | **Para of MPW Manual** | **Nature of Power** | **Competent Authority** | **Extent of Delegation** | **Conditions** | **Nature of Power** |
| **1.** | **In MPW Manual para 217 to 219 and Appendix 42 ( sr.no. 20 / page 464)** | **To ACCEPT TENDERS – for work of construction of buildings/plots, repairs, reconstruction, transit camps, housing, administrative building and commercial scheme, Slum redevelopments scheme under various DC rules and works related to ICT and special projects etc.** | **Authority** | **Full powers** | **When tendered amount is over & above Rs. 20 crores** | **A) Acceptance of tender – 1) Authority shall accept the tender , if , the tendered amount is within competency.<br>B) Negotiations -- The Chief Engineer shall negotiate with lowest bidder , in consultation with Financial Controller/A and submit the detailed bid appraisal report to Authority ( after obtaining concurrence of Vice President & CEO/A ) for final decision in respect of acceptance of tender.** |
| **2.** | **In MPW Manual para 217 to 219 and** | | **Vice President and C.E.O./ MHADA** | **Upto Rs. 20 crores** | **1) Any Tendered amount less than Rs. 20 crores and** | **A) Acceptance of tender --- (1) Vice President & CEO / A shall accept the tender , if , the tendered amount is within the** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Appendix 42 ( sr.no. 20 / page 464)** | | | | **tender premium quoted is more than 5 % , based on current schedule of rate.**<br>**2) In absence of Board , all powers of Board shall vest with the Vice President & CEO / A as per delegated powers vide Authority Resolution No. 6445 dated 20/08/2009 .** | **competency**<br>**B) If the Authority meeting is not held within the Bid validity period , then , the decision to accept tender shall be taken by the Hon. Vice President & Chief Executive Officer / MHADA in the extended period , in consultation with the Chief Engineer and FC/A and post facto approval shall be obtained from Authority.**<br>**C) Negotiations –**<br>**(i)The Chief Engineer shall negotiate with the lowest bidder , in consultation with the Financial Controller/A and submit the detailed bid appraisal report to Vice President & CEO/A for final decision in respect of acceptance of tender.**<br>(ii) **If , after negotiation , the negotiated rate/amount arrived is below the competency of VP/A , the detailed bid appraisal report shall be put up to the Vice President & Chief Executive officer / MHADA for issuing instructions to the concerned officer , competent to accept the tender for taking appropriate decision about acceptance of tender .** |
| **3.** | **In MPW Manual para 217 to 219 and Appendix 42 ( sr.no. 20 / page 464)** | | **Chief Engineer** | **Upto Rs. 1 crore** | **i) The tendered amount shall not exceed Rs. 1 crore.**<br>**ii) Tender excess /premium does not exceed 10%** | **A) Acceptance of tender -- Chief Engineer shall accept the tender if the tendered amount and % quoted are within the competency.**<br>**B) Negotiations ---**<br>**The Chief Engineer shall negotiate with the lowest bidder , in** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **over estimated cost based on current schedule of rates.** | **consultation with Financial Controller /Authority & the concerned Deputy Chief Engineer .**<br>**i) If , the negotiated rate/amount arrived is within the competency of Chief Engineer , the decision to accept the tender shall be taken by the Chief Engineer in consultation with the FC/A and with concurrence of Vice President / A .**<br>**ii) If the negotiated rate/amount arrived is below the competency of Chief Engineer, the concerned officer competent to accept tender, shall be instructed by the Chief Engineer to take decision about acceptance of tender .** |
| **4** | **In MPW Mannual para 217 to 219 and Appendix 42 ( sr.no. 20 / page 464)** | | **MHADB, MBRRB** | **Upto Rs. 10 crores .** | **i) The tendered amount shall not exceed Rs. 10 crores**<br>**ii) ) The tender excess does not exceed 10% over estimated cost based on current schedule of rates.** | **A) Acceptance of tender -- Board Shall accept the tender , if, the tendered amount and % quoted are within competency**<br>**B)Negotiations ---**<br>**The Chief Engineer shall negotiate with the lowest bidder, in consultation with the DyCE & CAO of concerned board and submit detailed bid appraisal report to the Board for taking decision about tender .**<br>**i) If , the negotiated rate/amount arrived is within the competency of Board, the decision to accept the tender shall be taken by Board .**<br>**ii) If , the negotiated rate/amount arrived is below the competency of MHADBoard/MBRR Board , the concerned officer competent to accept tender , shall be** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | **instructed by the Chief Engineer to take decision about acceptance of tender ..**<br>**C) In absence of Board , all powers of Board shall vest with the Vice President & CEO / A as per delegated powers vide Authority Resolution No. 6445 dated 20/08/2009 .** |
| **5** | **In MPW Manual para 217 to 219 and Appendix 42 ( sr.no. 20 / page 464)** | | **Other Regional Boards & MSIB** | **Upto Rs. 5 crores .** | **i) The tendered amount shall not exceed Rs. 5 crores .**<br>**ii) The tender excess / premium shall not exceed 10% over estimated cost based on current schedule of rates.** | **A) Acceptance of tender -- Board Shall accept the tender , if, the tendered amount and % quoted are within competency.**<br>**B)Negotiations ---**<br>**The Chief Engineer shall negotiate with the lowest bidder , in consultation with the DyCE & CAO of concerned board and submit detailed bid appraisal report to the Board for taking decision about tender .**<br>**i) If , the negotiated rate/amount arrived is within the competency of Board, the decision to accept the tender shall be taken by Board .**<br>**ii) If , the negotiated rate/amount arrived is below the competency of Board , the concerned officer competent to accept tender , shall be instructed by the Chief Engineer to take decision about acceptance of tender ..**<br>**C) In absence of Board , all powers of Board shall vest with the Vice President & CEO / A as per delegated powers vide Authority Resolution No. 6445 dated 20/08/2009 .** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **6** | **In MPW Manual para 217 to 219 and Appendix 42 ( sr.no. 20 / page 464)** | | **Chief Officer in the rank of Dy. Chief Engineer / Dy. Chief Engineer.** | **Upto Rs. 50 lakhs** | **i) Tendered amount shall not exceed Rs. 50 lakhs . ii) Tender excess / premium shall not exceed 10% over estimated cost based on current schedule of rate.** | **A) Acceptance of tender -- Dy.C.E. shall accept the tender, if , the tendered amount and % quoted are within the competency. B) Negotiations --- The Dy.C.E. shall negotiate with the lowest bidder , in consultation with CAO of the board . i) If after negotiations, negotiated offer is within the competency of Dy.C.E., the decision about acceptance of the tender shall be taken by the DyCE , with the concurrence of the Chief Engineer . ii) If , the negotiated rate/amount arrived is below the competency of Dy.C.E., the concerned officer competent to accept tender shall be instructed by the Dy.Chief Engineer to take decision about acceptance of tender.** |
| **7** | **In MPW Manual para 217 to 219 and Appendix 42 ( sr.no. 20 / page 464)** | | **Chief Officer in the rank of Ex. Engineer / Executive Engineer** | **Upto Rs. 10.00 lakhs** | **i) The tendered amount shall not exceed Rs. 10 lakhs . ii) Tender excess / premium shall not exceed 5% over estimated cost based on current schedule of rate.** | **A) Acceptance of tender -- E.E. Shall accept the tender if the tendered amount and % quoted are within the competency B) Negotiations -- The EE shall negotiate with the lowest bidder , in consultation with CAO i) If after negotiations, revised offer is within the competency of EE, ., the decision about acceptance of the tender shall be taken by the EE ,with concurrence of the DyCE .** |
| **8.** | **In MPW Mannual para 217 to 219 and Appendix 42** | | **Deputy Engineer** | **Upto Rs. 62,500** | **i) The quotation amount shall not exceed Rs. 62,500 / - ii) There is no excess /** | **In consultation with AAO and concurrence of the Executive Engineer.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **( sr.no. 20 / page 464)** | | | | **premium over & above the estimated cost mentioned in quotation , based on current schedule of rate.** | |

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहें.

## बाब क्रमांक : २५१/१४

विषय :- मोतीलाला नगर - १, २ व ३ गोरेगांव (प) येथील
म्हाडा वसाहतीचा पुनर्विकास सुधारित वि.नि.नि.३३ (५)
अंतर्गत म्हाडामार्फत करण्याबाबत.

---------------------

**ठराव क्रमांक : ६६४०** **दिनांक : २४/१०/२०१३**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या मोतीलाल नगर-१, २ व ३ गोरेगांव (प) येथील एकूण ५,७६,८४८ चौ.मी. जमिनीवर म्हाडा वसाहतीचा पुनर्विकास सुधारित वि.नि.नि. ३३(५) अंतर्गत म्हाडामार्फत योजना राबविण्याचे अनुषंगाने वास्तुशास्त्रज्ञ नेमण्यास तसेच अनुषंगिक कार्यवाहीला मंजूरी देण्यात येत आहे. तसेच मोतीलाल नगर येथिल पुनर्विकास प्रकल्प राबविण्याकरिता धोरण निश्चित करण्याकरिता व योजनेच्या तांत्रिक बाबी, निविदा प्रक्रीया, कॉर्पस फंड, संक्रमण व्यवस्था, भाडे इत्यादी निश्चित करण्यासाठी मा. मुख्य अधिकारी /मुंबई मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य अभियंता -२ /प्राधिकरण, विधी सल्लागार /प्राधिकरण, उपमुख्य अभियंता (प) //मुंबई मंडळ, कार्यकारी अभियंता /गोरेगांव //मुंबई मंडळ, वास्तुशास्त्रज्ञ //मुंबई मंडळ व निवासी कार्यकारी अभियंता /सदस्य सचिव यांचे समितीचे गठन करणेस प्राधिकरण मंजूरी देत आहे.

## बाब क्रमांक : २५१/१६

विषय :- मुंबई मंडळाच्या वसाहतींमध्ये जाहिरात फलक उभारण्यासाठी परवानगी देणेबाबतचे धोरण.

---------------------

ठराव क्रमांक : ६६४१ दिनांक : २४/१०/२०१३

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वसाहतींमध्ये मंडळाच्या ताब्यात असलेल्या मोकळया भूखंडांवर जाहिरात फलक उभारावयाच्या कामांकरिता Experts ची एक समीती स्थापन करण्यात यावी. सल्लागार ( Consultant ) यांनी जाहिरातीसाठी जागा आणि प्रकार प्रस्तावित केल्यानंतर Expert Committee Asthetic दृष्टी व त्याचे evaluation करुन जागा आणि प्रकार ठरवतील. त्यानंतर प्रस्तावित कल्याप्रमाणे निविदेची कार्यवाही करण्यात यावी, यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

## बाब क्रमांक : २५१/१७

विषय :- स.क्र. ५५/१, ५५/२, ५५/३ तपोवन कॅालोनी सावेडी,
अहमदनगर येथे १५ मध्यम उत्पन्न गटातील सदनिकांचे
बांधकाम करणे.

---------------------

ठराव क्रमांक : ६६४२ दिनांक : २४/१०/२०१३

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सर्व्हे क्र. ५५/१, ५५/२, ५५/३ तपोवन कॅालोनी सावेडी, अहमदनगर येथील १५ गाळे मध्यम उत्पन्न गटाच्या अंदाजित रक्कम रु. २,०२,५६,९१७/- /- च्या किंमतीच्या ई-निविदेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या मे.डी.व्ही.मोहिते आणि कंपनी, यांच्या सर्वात कमी दराच्या म्हणजेच १२% टक्के अधिक दराच्या म्हणजेच रु. २,२६,८७,७४७/- ( रु. दोन कोटी सव्वीस लाख सत्याऐंशी हजार सातशे सत्तेचाळीस फक्त ) या प्रथम निम्नतम निविदेस मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

## बाब क्रमांक : २५१/१८

विषय :- पत्राचाळ सिध्दार्थनगर, गोरेगांव येथील म्हाडा अभिन्यासातील पुर्नविकासात उपलब्ध होणाऱ्या गाळयांचे विनियम १३(२) अंतर्गत वितरण करण्याबाबत.

------------------------------

ठराव क्रमांक : ६६४३ दिनांक : २४/१०/२०१३

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, म्हाडा अभिन्यासातील पत्राचाळ, सिध्दार्थ नगर, गोरेगांव या योजनेतील पुर्नविकासात उपलब्ध होणाऱ्या २३०० गाळयापैकी ८०६ गाळे विनिमय १३(२) अंतर्गत परिशिष्ठा प्रमाणे वर्ग-१, २, ३, ४, ५, ६ व ७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वितरीत करण्यासाठी मान्यता देऊन वरीलप्रमाणे वितरण करण्यासाठी शासनाच्या मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायी करण्याची वाट न पाहता करण्यास संमती देण्यात येत आहे.